नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९९९ नुसार मुळ अधिनियमाच्या कलम २१ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या योजनांबाबत.

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
शासन परिपत्रक क्र. नाजक २०१८/प्र.क्र.२९/नाजकधा-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ५ डिसेंबर, २०१८.

## शासन परिपत्रक

केंद्र शासनाने मूळ नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसित केल्यानंतर नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ राज्य शासनाने दि.२९.११.२००७ पासून स्विकृत केला आहे. सदर निरसन अधिनियमानुसार कलम २० खालील सुटीचे आदेश व कलम १०(३)/१०(५) ची कार्यवाही करुन ताब्यात घेण्यात आलेल्या जमिनींना संरक्षण देण्यात आलेले आहे. यासंदर्भात नाजकधा निरसन अधिनियम वैधतेबाबत मा. उच्च न्यायालयासमोर दाखल केलेल्या याचिका क्र. ९८७२/२०१० व इतर संलग्न याचिकांवर मा. उच्च न्यायालयाने दि.०३.०९.२०१७ रोजी निर्णय दिलेला असून, कलम २० खालील सूट देण्यात आलेल्या आदेशावरील अटी व शर्ती योजनाधारकांवर बंधनकारक असल्याचा निर्णय दिलेला आहे. तद्नंतर सदरचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये आव्हानित करण्यात आलेला असून, मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ या प्रकरणी दि.०१.१२.२०१४ च्या अंतरिम आदेशान्वये कलम २० योजनाधारकांबाबत कोणत्याही प्रकारची प्रतिकूल परिणाम होईल, अशी कारवाई (Coercive action) करु नये असे आदेश दिलेले आहेत.

तथापि, नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ नुसार मुळ अधिनियमाच्या कलम २१ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या योजनांना संरक्षण प्राप्त नाही. या पार्श्वभूमीवर मा.उच्च न्यायालयासमोर दाखल रिट याचिका क्र.११३८/२०१४ मध्ये मा. न्यायालयाने दि.११.०३.२०१५ रोजी दिलेले आदेश विचारात घेता, नाजकधा कलम २१ अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आदेशांना संरक्षण प्राप्त नाही. त्यामुळे सदर आदेश विचारात घेता शासनाने ताबा घेतलेल्या जमिनी/सदनिका वगळता, उर्वरीत कलम २१ अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनी नाजकधा अधिनियमाच्या कक्षेबाहेर गेल्या आहेत. त्यामुळे अशा सूट देण्यात आलेल्या जमिनींचा विकास / पुर्नविकास करण्यासाठी सक्षम प्राधिकारी किंवा शासनाच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. अशा जमिनींचा विकास करण्यासाठी संबंधीत नियोजन प्राधिकरणाने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदी विचारात घेवून आवश्यक कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(श्री. द. यादव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ उप सचिव.
२) प्रधान सचिव(नवि-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३) जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, मुंबई/ पुणे/ ठाणे/ नाशिक/ नागपुर/ उल्हासनगर/ सोलापूर/ कोल्हापूर/ सांगली नागरी समुह.
४) आयुक्त, महानगरपालिका मुंबई/ पुणे/ ठाणे/ नाशिक/ नागपुर/ उल्हासनगर/ सोलापूर/ कोल्हापूर/ सांगली.
५) अवर सचिव/ कक्ष अधिकारी (नाजकधा-१,२,३), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
६) निवडनस्ती (नाजकधा-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.



Scanned with CamScanner